## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## जाहिरात

क्र.संगाबाअवि/२/F-१०३०/२०१७ दिनांक : ०३.०७.२०१७

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वार्षिक हिशोबाचे अंकेक्षण करण्याकरीता आर्थिक वर्ष २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या दोन वर्षाकरिता विद्यापीठाचे वैधानिक लेखा परिक्षक म्हणून सनदी लेखापालाची नियुक्ती करावयाची आहे.

**सनदी लेखापालाच्या नियुक्तीच्या शर्ती व अटी.**

१) सनदी लेखापालाची नियुक्ती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम-२०१६ च्या कलम १३५(२) प्रमाणे करण्यात येईल.

२) विद्यापीठ नियमाप्रमाणे सनदी लेखापालाला वार्षिक अंकेक्षण फी सर्व करांसह रु. ५५,०००/- (रु.पचावन्न हजार फक्त) इतकी देण्यात येईल.

३) नियुक्त होणाऱ्या सनदी लेखापालाने आपल्या दरवर्षीच्या अंकेक्षण कालावधीत आपला किमान दरमहा ५ तास इतका अवधी (सहाय्यकांच्या कामाचे तास सोडून) विद्यापीठाला देणे बंधनकारक राहील.

४) सनदी लेखापालानी आपला प्राथमिक अंकेक्षण अहवाल प्रत्येक वर्षाच्या ३० जुन पर्यंत विद्यापीठाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

५) प्राथमिक अहवालावरचा विद्यापीठाचा अनुपालन अहवाल प्रत्येक वर्षाच्या १५ जुलै पर्यंत सनदी लेखापालाकडे सादर करण्यात येईल.

६) अनुपालन अहवाल सादर केल्यानंतर ३१ जुलैच्या आत अंतिम अंकेक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

७) अंकेक्षणाच्या काळात विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांना प्रत्यक्ष भेटी देऊनच अंकेक्षण कार्य करावे लागेल.

८) अंकेक्षणासंदर्भात विद्यापीठाद्वारे आयोजित विविध सभांना (गरज भासल्यास) सनदी लेखापालाला स्वत:उपस्थित रहावे लागेल.

९) अंकेक्षण अहवाल मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत द्यावा लागेल.

१०) विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्र शासन व तत्सम अनुदान देणाऱ्या संस्थांकडून प्राप्त अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी अंकेक्षित करुन प्रमाणित करुन द्यावे लागेल. त्याचे शुल्क प्रति उपयोगिता प्रमाणपत्र रुपये ५००/- इतके अदा करण्यात येईल.

११) इच्छूक सनदी लेखापालनी खालील बाबी अंतर्भूत करुन आपला अर्ज दिनांक १५.७.२०१७ पर्यंत विद्यापीठाकडे सादर करावा. त्यानंतर येणारे अर्ज विचारात घेतल्या जाणार नाहीत.

अ) मागील पाच वर्षात अंकेक्षण केलेल्या संस्थांचे नाव (त्या संस्थेच्या वार्षिक उलाढालीसह) अर्जात नमूद करावे.

ब) सनदी लेखापालाच्या कार्यालयाकडे लेखा परिक्षणाचे काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेसह नमूद करावी.

क) उपरोक्त प्रमाणेच उपलब्ध असलेल्या इतर सेवा-सुविधांचा उल्लेख आपल्या अर्जात करावा.

स्वा/-
डॉ.श.रा.आस्वले,
वित्त व लेखा अधिकारी,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.